महाराष्ट्र शासन

संकीर्ण२०१८/प्र.क्र.०७/२०१८/विनियम
वित्त विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०९ मार्च, २०१८.

<u>संदर्भ</u> :- १) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१५/१२, दि.२५/०५/२००६
२) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र.पीओडी-१००७/प्र.क्र.०९/१८ (र.व का.),दि.१४/११/२०१३
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकिर्ण-२०१२/प्र.क्र.५४/१८ (र. व का.), दि.११/८/२०१४.

कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हा राज्यात लागू करण्यात आलेला आहे. या अधिनियमातील कलम ९(२) नुसार प्रत्येक कार्यालयाचा किंवा विभागाचा प्रमुख, त्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित सर्व बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने त्या सादर करण्यासाठी शक्यतो अधिका-यांचे तीन स्तर निश्चित करील अशी तरतूद आहे.

२. त्या अनुषंगाने विनियम कार्यासनाशी संबंधित विषयांच्या बाबतीत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यासाठी सादरीकरणाचे तीन स्तर निश्चित करण्यात येत आहेत. तथापि, वरिष्ठांचे निर्देश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास प्रकरण परत्वे योग्य तो बदल करण्यात येईल. तसेच धोरणात्मक बाबींच्या प्रकरणात दि.११.८.२०१४ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार सादरीकरणाचे तीनपेक्षा अधिक स्तर असतील.

३. सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०९१२५०३९३४०५ असा आहे. हा कार्यालयीन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Anudeep Shrinivas Dighe

Digitally signed by Anudeep Shrinivas Dighe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=75f50c6671abf79e06e7d05c1f27cdae17ad6b947f5b0d740fa705320bede741, cn=Anudeep Shrinivas Dighe
Date: 2018.03.09 12:50:35 +05'30'

(अ.श्री.दिघे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) अपर मुख्य सचिव (वि.सु.) यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
४) उप सचिव (विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
५) उप सचिव (प्रशासन), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) अवर सचिव (प्रशा-२), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) विनियम कार्यासन संग्रहार्थ

वित्त विभाग/विनियम

कार्यालयान आदेश क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र. ०७/२०१८/विनियम., दिनांक ०९/०३/२०१८ सोबतचे विवरणपत्र. शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ९(२) नुसार कार्यासनाशी संबंधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करण्याबाबत अधिका-यांचे तीन स्तर निर्धारित करणे.

अ. क्र.	कार्यासनाकडून हाताळले जाणारे कामकाज	सादरीकरणाचे तीन स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम अधिकारी	आदेश निर्गमित करण्यास सक्षम अधिकारी
१.	२.	३.	४.	५.	६.	७.
१.	सर्व विभागांकडून प्राप्त होणारे अनौपचारिक संदर्भ प्रकरणे	स.क.अ./ क.अ. / अ.स.	उ. स. / स. स.	प्र.स.(ले.व को.) / अ.मु.स.(वि.सु.) / प्र.स.(व्यय)	प्र.स.(ले.व को.)	--
२.	वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-दोन मध्ये विशेष वित्तीय अधिकाराच्या अनुषंगाने प्राप्त होणारे अनौपचारिक संदर्भ.	स.क.अ./ क.अ. / अ.स.	उ. स. / स. स.	प्र.स.(ले.व को.) / प्र.स.(व्यय) / अ.मु.स. (वि.सु.) / अ.मु.स. (वित्त)	मा.मंत्री (वित्त) / मा.मुख्यमंत्री	संबंधित प्रशासकीय विभाग
३.	वाहन आढावा विषयक प्रकरणे/ वाहन खरेदी प्रकरणे (वाहन आढावा झालेला नसल्यास)	स.क.अ./ क.अ. / अ.स. / उ.स.	परिवहन आयुक्त	अ.मु.स.(प्र.सु./र वका), सामान्य प्रशासन विभाग	अ.मु.स.(वि.सु.) तथा अध्यक्ष, राज्यस्तरीय वाहन आढावा समिती	संबंधित प्रशासकीय विभाग
४.	वाहन खरेदी विषयक प्रकरणे (वाहन आढावा झालेला असल्यास)	स.क.अ./ क.अ. / अ.स.	उ. स. / स. स.	प्र.स.(ले. व को.) / प्र.स.(व्यय)	अ.मु.स.(वि.सु.) तथा अध्यक्ष, राज्यस्तरीय वाहन आढावा समिती	संबंधित प्रशासकीय विभाग
५	कार्यासनाशी संबंधित विषयासंदर्भातील सर्व धोरणात्मक प्रकरणे.	स.क.अ./ क.अ. / अ.स.	उ. स. / स. स.	प्र.स.(ले. व को.) / अ.मु.स.(वित्त)	मा.मंत्री (वित्त) / मा.मुख्यमंत्री	उप सचिव / अवर सचिव
६.	कार्यासनाशी संबंधित वित्तीय प्रकाशनांचे (मुंबई वित्तीय नियम, १९५९, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-पहिला इ.) अद्ययावतीकरण, नियमात सुधारणा, दुरुस्त्या इ.कामकाज.	स.क.अ./ क.अ. / अ.स.	उ. स. / स. स.	प्र.स.(ले. व को.) / अ.मु.स. (वित्त)	मा.मंत्री (वित्त) / मा.मुख्यमंत्री	प्रधान सचिव (ले.व को.) / उप सचिव